महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

# महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स. तिसरा मजला. रामजीभाई कमानी मार्ग.बेलार्ड इस्टेट. मुंबई – ४०० ००१.
दूरध्वनी क्र. २२६५८३७५, २२६११७३४ फॅक्स क्र. २२६१४३३१
Website : www.mahammb.com Email : ceommb@gmail.com

सत्यमेव जयते

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड विभागामध्ये बंदर अधिकारी (गट अ) तसेच अधिक्षक अभियंता (गट अ ), कार्यकारी अभियंता (गट अ) आणि सहाय्यक जल आलेखन सर्व्हेक्षक (गट ब ) ही पदे निव्वळ कंत्राट पध्दतीने भरावयाची असून त्यासाठी खाली नमूद केलेल्या अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | पदासाठी लागणा-या अर्हतेचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | बंदर अधिकारी<br>प्रतिमहा एकत्रित ठोक रक्कम रु.६८,०००/- | १ | १) केंद्र शासनाने मास्टर ऑफ फॉरेन गोईंग शिप म्हणून दिलेले सक्षमता प्रमाणपत्रधारक. ( Certificate of Competency )<br>२)फॉरेन गोईंग शीपवर ६ महिन्यापेक्षा जास्त कमांड केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>३) जाहिरातीच्या दिनांकास कमाल वयोमर्यादा ४० वर्ष व मागासवर्गीयासाठी वयोमर्यादा पाच वर्षानी शिथिल राहील. |
| २ | अधिक्षक अभियंता (स्थापत्य)<br>प्रतिमहा एकत्रित ठोक रक्कम रु.६८,०००/- | १ | १) मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी.<br>२) शासकीय विभाग किंवा निमशासकीय विभाग किंवा कोणत्याही व्यवसाय संस्थेमध्ये यामधील स्थापत्य विषयक बांधकामाचा १० वर्षाचा अनुभव आवश्यक त्यापैकी ७ वर्षाचा अनुभव हा कार्यकारी अभियंता या पदाच्या समतुल्य व स्वतंत्र जबाबदारीच्या पदावरील असणे आवश्यक.<br>३) मराठी व इंग्रजी या भाषांमधून बोलता, वाचता व लिहिता येईल इतके पुरेसे ज्ञान आवश्यक<br>४) जाहिरातीच्या दिनांकास कमाल वयोमर्यादा ४० वर्षपेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयासाठी/शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा पाच वर्षानी शिथिल राहील.<br>(प्रतिनियुक्तीकरीता वयोमर्यादेची अट नाही)<br>किंवा<br>अधिक्षक अभियंता किंवा त्यापेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या पदावरुन महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त. |
| ३ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य)<br>प्रतिमहा एकत्रित ठोक रक्कम रु.५८,०००/- | २ | १) मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी.<br>२) शासकीय विभागात किंवा निम शासकीय किंवा कोणत्याही व्यवसाय संस्थेमध्ये स्थापत्य बांधकामाचा ७ वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा अनुभव.<br>३) मराठी व इंग्रजी या भाषांमधून बोलता, वाचता व लिहिता येईल इतके पुरेसे ज्ञान आवश्यक<br>जाहिरातीच्या दिनांकास कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष व मागासवर्गीयासाठी/शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा पाच वर्षानी शिथिल राहील.<br>किंवा<br>कार्यकारी अभियंता किंवा त्यापेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या पदावरुन महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त. |
| ४ | सहाय्यक जल आलेखन सर्व्हेक्षक<br>रु.३५,०००/- | २ | १)मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा पदविका किंवा शासन मान्य समतुल्य अर्हता किंवा नॅशनल हायड्रॉग्राफिक ऑफिस यांच्या छत्राखालील हायड्रॉग्राफिक स्कुल गोवा यांचे कडील सर्व्हे रेकॉर्डर प्रथमश्रेणी धारक.<br>२) शासन विभाग किंवा निम शासकीय संस्था किंवा व्यवसायीक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आस्थापनेवरील सिनियर फिल्ड असिस्टंट म्हणून ३ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव.<br>जल आलेखन सर्व्हेक्षणामधील १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त अनुभव असलेल्या माजी नौसैनिकास प्राधान्य देण्यात येईल.<br>३) टाईड रिडिंग, इको साऊडिंगवरुन खोलीचे मोजमाप, डिजीटल डाटा रेकॉर्डिग थेडोलाईट, लेव्हल, करंट मिटर, ॲटोमेटॅड टाईड गेजेस आणि डिफरेन्शल ग्लोबल पोझीशिनींग सिस्टम इ. उपकरणे हाताळण्याची माहिती असणे आवश्यक.<br>४) जाहिरातीच्या दिनांकास कमाल वर्यामर्यादा ३५ वर्ष व मागासवर्गीयासाठी/शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा पाच वर्षानी शिथिल राहील. |

उपरोक्त पदावरील नियुक्त्या हया निव्वळ तातपुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीवर करण्यात येणार असून त्यासाठी वरील प्रमाणे पात्रतेची पूर्तता करणा-या उमेदवारांनी या जाहिरातीच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसांत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह खाली नमूद केलेल्या नमून्यात संपूर्ण तपशिलासह अर्ज करावेत. जाहिरातीत उल्लेख केलेली अर्हता सबंधीत पदासाठी आवश्यक असलेली किमान पात्रता असून अनुक्रमांक २ व ३ वरील पदांकरिता सेवानिवृत्त असलेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच उपलब्ध पदांच्या तुलनेत प्रथमदर्शनी अर्हताप्राप्त उमेदवारांच्या अर्जाची संख्या विचारात घेऊन मुलाखतपात्र उमेदवारांसाठी निकष ठरविला जाईल व त्यानुसार त्यांची निवड करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला,
रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई ४०० ००१.

१. संपूर्ण नांव ( आडनाव प्रथम ) ——————————————————————

२. संपूर्ण पत्ता ——————————————————————

_____________________

दूरध्वनी ——————————— भ्रमणध्वनी (मोबाईल नं.) ————

३. जन्मतारीख ——————————————————————

(दिनांक १.०६.२०१४ रोजीचे वय वर्षे महिने )

४. सेवानिवृत्त झाले असल्यास
सेवानिवृत्तीचा दिनांक ———————————

५. ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले ते पद ————————————————————-

६. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव किंवा मिळालेली पदवी | परीक्षा उत्तीर्ण होण्याचे वर्ष | बोर्डाचे/विद्यापिठाचे नांव | विषय | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७. शासकीय अनुभवाचा तपशील

| अ.क्र. | अनुभवाचा कालावधी | धारण केलेले पद | कार्यालयाचे नाव व पत्ता | सध्या मिळत असलेले निवृत्ती वेतन | अपेक्षित वेतन/ मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी असून सदर माहिती खोटी व चुकीची आढळल्यास अर्जाचा विचार केला जार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्थळ :-
दिनांकः- (———————————)